राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

क्र.म.वि./3654
दिनांक: 22/8/08

अध्यक्ष / सचिव,
अमर सेवा मंडळ, नागपूर
द्वारा- श्री गोविंदराव वंजारी कॉलेज ऑफ
इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, सलाई गोधणी, नागपूर.

विषय :- सत्र 2008-09 पासुन नविन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :- शासन पत्र क्र. टि.ई.एम.- 2008 / (262/08) / ताशि-1, दिनाक 30 जुन 2008.

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित पत्रानूसार राज्य शासनाने आपल्या संस्थेला सत्र 2008-09 पासुन नविन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास दिलेल्या परवानगीनूसार व स्थानिय चौकशी समितीने केलेल्या शिफारशीनुसार विव्दत परिषदेच्या वतीने मा.कुलगुरुनी म.वि.अधिनियम 1994 च्या कलम 14(7) अंतर्गत नविन महाविद्यालयास सत्र 2008-09 पासुन सुरु करण्याकरिता खालीलप्रमाणे प्रथम संलग्निकरण प्रदान करण्यास मान्यता प्रदान केली आहे.

| संस्थेचे नांव | महाविद्यालयाचे नांव व ठिकाण | विद्याशाखा / अभ्यासक्रम | विद्यार्थी संख्येचे निकष |
|---|---|---|---|
| अमर सेवा मंडळ, नागपूर. | श्री गोविंदराव वंजारी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, सलाई गोधणी, नागपूर. | 1. इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरींग.<br>2. कॉम्प्युटर सायंस ॲण्ड इंजिनिअरींग.<br>3. इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेली-कॉम्यु.इंजि.<br>4. इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी. | 60 विद्यार्थी<br>60 विद्यार्थी<br>60 विद्यार्थी<br>60 विद्यार्थी |

**प्रथम संलग्निकरण खालील अटींच्या अधिन देण्यात येत आहे.**

1. उपरोक्त नविन महाविद्यालयाला देण्यात आलेले प्रथम संलग्निकरण विद्यापीठाव्दारे गठीत स्थानिय चौकशी समितीने महाविद्यालयास भेट देवून सादर केलेल्या अहवालात दर्शविलेल्या त्रृटया पुर्ण करण्याच्या अटीवर देण्यात आलेले आहे. (समितीच्या अहवालाची प्रत सोबत जोडलेली आहे.) महाविद्यालयास देण्यात आलेले संलग्निकरण हे तात्पुरत्या स्वरुपाचे असुन स्थानिय चौकशी समितीने दर्शविलेल्या अटी महाविद्यालय पुर्ण करण्यास असमर्थ ठरल्यास विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्याचे अधिकार विद्यापीठाकडे राहील.
2. उपरोक्त महाविद्यालय कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास आपले महाविद्यालय तयार असून त्या आशयाचे हमीपत्र महाविद्यालयाने विभागीय सहसंचालक (तंत्र शिक्षण) नागपूर यांना सादर करण्याचे अटीवर ही मान्यता देण्यात येत आहे.
3. महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रमीकेनुसार अभ्यासक्रम पुर्ण करण्याचे दृष्टीने शिकवणी वर्गाचे 180 दिवसाचे अध्यापन पुर्ण करण्याचे अटीवर संलग्निकरण देण्यात येत आहे.
4. या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या आर्थिक बाबी संबंधी सर्वस्वी जबाबदारी स्विकारणे संस्थेवर बंधनकारक राहील.
5. कायम विना अनुदान तत्वावर संस्थेस महाविद्यालय आर्थिकदृष्टया चालविणे शक्य व्हावे यासाठी संस्थेने राज्याच्या शिक्षण शुल्क समितीकडून शुल्क ठरवून घ्यावे.
6. शासनाने मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमांपैकी ज्या अभ्यासक्रमांना विद्यापीठामार्फत केंद्रिकृत प्रवेश पध्दतीने प्रवेश दिले जातात अशा अभ्यासक्रमासाठी चालू वर्षासाठी प्रकिया पूर्ण झाली असल्यास ते अभ्यासक्रम पुढील वर्षापासून संबंधित महाविद्यालयांनी सुरु करावेत

कृपया कळावे.

आपला,

(फु. ख. भगत),
सहायक कुलसचिव (म.वि.)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,नागपूर विद्यापीठ

प्रतिलिपी माहितीकरिता सादर:-

1. संचालक तंत्र शिक्षण, मुंबई.
2. सहसंचालक, (तंत्र शिक्षण), नागपूर विभाग,नागपूर
3. संचालक बी.सी.यु.डी.
4. वित्त व लेखा अधिकारी.
5. परिक्षा नियंत्रक,
6. उपकुलसचिव विद्या विभाग,
7. सहायक कुलसचिव, परिक्षा विभाग, गोपनिय विभाग, व्यावसायिक परिक्षा, परिक्षा व चौकशी
8. संबंधित लिपीक, शिक्षक मान्यता,

} राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ,नागपूर.